अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. १० ऑक्टोबर २०२३ | ▸ पान ३



विश्वकप स्पर्धे मध्ये नेदरलँड आणि न्यूझीलंड यांच्यातील सामना न्यूझीलंडने ९९ धावांनी जिंकला. हा विश्वकपमधील न्यूझीलंडचा सलग दुसरा विजय ठरला.

# शरद पवार मनमानीपणे पक्ष चालवतात

## अजित पवार गटाची आयोगाकडे तक्रार

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राष्ट्रवादी कुणाची या मुद्द्यावर निवडणूक आयोगात सुरू असलेली सोमवारची सुनावणी संपली. या पुढची सुनावणी ही ९ नोव्हेंबर रोजी होणार आहे. राष्ट्रवादीत आतापर्यंत लोकशाही मार्गाने काम होत नव्हते, शरद पवार आपले घर चालवल्याप्रमाणे पक्ष चालवतात असा दावा अजित पवार गटाकडून करण्यात आला.**



ज्या लोकांची शरद पवारांनी नियुक्ती केली त्याच पवारांनी त्यांची नियुक्ती कशी काय केली? असा प्रश्नही अजित पवारांकडून उपस्थित करण्यात आला तसेच सर्वाधिक आमदारांची संख्या आपल्यामागे असल्याचे सांगत पक्षही आपलाच असल्याचे अजित पवार गटाने युक्तिवाद केला.

राष्ट्रवादीतील सर्वाधिक आमदार आपल्यामागे असल्याचा दावा अजित पवार गटाकडून करण्यात आला. त्याआधारे पक्षाचे चिन्ह आपल्यालाच मिळावे अशी मागणीही केली. अजित पवार गटाकडून सादिक अली आणि पीए संगमा केसचा दाखला देण्यात आला.

सादिक अली केसमध्ये आमदारांच्या संख्येला महत्व देण्यात आले होते तर पीए संगमा प्रकरणी सर्वाधिक आमदार आणि पदाधिकाऱ्यांची संख्या निर्णय देताना महत्त्वाची समजली होती. शरद पवार हे आपल्या मर्जीप्रमाणे कारभार करतात, आपले घर चालवल्याप्रमाणे पक्ष चालवतात असा आक्षेप अजित पवार गटाकडून करण्यात आला. त्यामुळे पक्षांतर्गत लोकशाही नसल्याचा आरोपही करण्यात आला.

### काय युक्तिवाद करण्यात आला?

▸▸ आमच्याकडे दीड लाखाहून अधिक शपथपक्ष आहेत. ▸▸ नियमानुसार नियुक्त्या केल्या जात नव्हत्या. शरद पवार आपले घर चालवल्याप्रमाणे पक्ष चालवत आहेत. ▸▸ अजित पवार गटाकडून सादिक अली केसचा दाखला दिला. सादिक अली केसमध्ये आमदारांच्या संख्येला महत्व देण्यात आलं होतं. ▸▸ अजित पवार गटाचे वकील मनिंदर सिंह यांनी राष्ट्रवादीची घटना वाचून दाखवली. ▸▸ जे स्वतः निवडून आले नाहीत ते इतरांच्या नेमणुका कशा करू शकतात. अजित पवार गटाचा शरद पवारांवर थेट आक्षेप. ▸▸ पदाधिकाऱ्यांच्या फक्त नियुक्त्या व्हायच्या, निवडणूक व्हायच्या नाहीत. ▸▸ आमच्याकडे एक लाखाहून शपथपत्रं आहेत, शरद पवारांकडे ४० हजार शपथपत्रं आहेत असं अजित पवार गटाने सांगितलं. ▸▸ शरद पवारांनी सर्व नियम पायदळी तुडवले. ▸▸ ज्यांची निवड पवारांनी केली तेच पवारांची निवड कशी करू शकतात? ▸▸ पक्षात फूट आहे की नाही हे तुम्ही ठरवू शकता– अजित पवार गट ▸▸ राष्ट्रवादी चिन्ह आम्हालाच मिळावं. ▸▸ अजित पवार गटाकडे किती आमदार आहेत हे जाहीर करावं, शरद पवार गटाची मागणी.

## माढ्यातून सुप्रिया सुळे यांनी माझ्याविरुद्ध लढून दाखवावे

### खा. निंबाळकर यांचे खुले आव्हान

✔ सुराज्य/सोलापूर





माढा लोकसभा मतदारसंघातून शरद पवार लढणार नसतील तर सुप्रिया सुळे यांनी निवडणूक लढवावी असे आव्हान भाजपचे खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी दिले. मी मतदारसंघात आहे की नाही किंवा लोकांची कामं केली आहेत की नाहीत हे बघण्यासाठी पवारसाहेबांनी किंवा सुप्रिया सुळेंनी माझ्या विरोधात निवडणूक लढवावी. त्यानंतर त्यांना माढ्यात विकासकामं झाली की नाही हे कळेल असे निंबाळकर म्हणाले.

पंढरपूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते म्हणाले, मी काय कायमस्वरुपी या लोकसभा मतदारसंघाचा खासदार म्हणून शिक्का मारला नाही. पक्षाला जर वाटलं की हा माणूस काम करतोय तर पक्ष मला पुन्हा संधी देईल. नाहीतर पक्ष ज्याला कोणाला संधी देईल त्याचे काम आम्हाला सर्वांनी ताकदीने करावं लागेल असे निंबाळकर म्हणाले. मी मतदारसंघात कामे करत असतो. मी लोकसभेत किती बोललो आणि किती कामे पूर्ण केली याची माहिती सुप्रिया सुळे यांनी घ्यावी, असे निंबाळकर म्हणाले. मोहिते पाटील आणि निंबाळकर वादावर बोलताना प्रत्येक जण इच्छुक असतात.

तिकिट देण्याचा अधिकार पक्षाचा असतो. जो तो तिकिट मागत असतो. आता पक्ष ज्याला तिकिट देईल त्याचे काम सर्वांनाच जोमानं करावं लागेल असे खासदार निंबाळकर म्हणाले.

### मी बोलण्यापेक्षा काम करतो

मला मतदारसंघातील लोकांचे प्रश्न सोडवायचे आहेत. माझ्या आधीच्या काळात शरद पवार हे देखील माढा मतदारसंघाचे खासदार होते. ते किती वेळा मतदारसंघात आले हे सुप्रिया सुळेंनी सांगावे. लोकसभेत मी बोललो आहे. लोकांचे प्रश्न मांडले आहेत. मी बोलण्यापेक्षा काम केले आहे. सुप्रिया सुळेंच्या वडीलांपेक्षा जास्त माढा मतदारसंघात मी काम केल्याचे खासदार निंबाळकर म्हणाले.





## गुन्हे शाखेकडून मोटारसायकल चोरीसह ७ गुन्हे उघड

✔ सुराज्य/सोलापूर

शहर गुन्हे शाखेने मोटारसायकल चोरीसह ७ गुन्हे उघडकीस आणले आहेत. गुन्हे शाखेचे व पो.नि.सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षीरसागर व त्यांच्या तपास पथकाला हायवा ट्रक वाहनाची बॅटरी चोरी करणारे दोन इसम हे सलगरवस्तीवरून नागोबा मंदिरमार्गे सोलापूर शहरात येणार आहे, अशी माहिती मिळाली.

त्याप्रमाणे सापळा रचून विकी दशरथ गायकवाड (वय-२४, संदीप मौला गायकवाड, वय-३३, चालक) यांना ताब्यात घेतले. त्यांनी ५ मोटारसायकल आणि १ बॅटरी असे एकूण ६ चोरी केल्याची कबुली दिली. यामध्ये चोरीची मोटारसायकल विकत घेणारा भंगारवाला संजय संभाजी माने (रा.रामवाडी, सोलापूर) आरोपी म्हणून निष्पन्न झाल्यानंतर १ लाख २२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. फौजदार चावडी पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या सोने-चांदी दागिने सोडणाऱ्या महिलेस गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले. तिच्या ताब्यातून ६७ हजार ५०० रुपये किमतीचे सोने चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहे. गुन्हे शाखेचे स.पो.नि. जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथकातील पो.ह. योगेश बर्डे यांना मिळालेल्या माहितीवरुन सापळा रचून सुचित्रा जाधव (वय-३६, रा.होटगी) हिला ताब्यात घेतले. तिने सोने व चांदीचे दागिने चोरी केल्याची कबुली दिली.

ही कामगिरी, सहा.पोलीस निरीक्षक संजय क्षिरसागर, सपोनि जीवन निरगुडे, अनिल जाधव, महेश शिंदे, सैपन सय्यद, भारत पाटील, राजु मुदगल, कुमार शेळके, पोह. योगेश बर्डे, बापू साठे, वाजीद पटेल, संजय साळुंखे, अर्चना स्वामी मपोना. निलोफर तांबोळी, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, अविनाश पाटील, प्रकाश गायकवाड, बाळू काळे यांनी केली.

## दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात पोलीस वाहन पलटी

✔ सुराज्य/सांगली



दुचाकी वाहनाला वाचविण्याच्या प्रयत्नात पोलीसांचे वाहन पलटी होऊन तीन पोलीस जखमी झाल्याची घटना सोमवारी मिरजेजवळ बेडग रस्त्यावर घडली. अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर मिरजेतील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पोलीसांचे निर्भयापथक गस्तीवरुन परत येत असताना समोरुन येत असलेल्या प्रयत्नात वाहन बाजूच्या शेतात जाऊन पलटी झाले. यामध्ये पोलीस कर्मचारी संभाजी भेंडे, अजित कोळेकर व इरकत्ता येवन्नावर हे किरकैळ जखमी झाले. दुचाकीस्वार महादेव निवलगी (रा. मदभावी, ता.अथणी) हा गंभीर जखमी झाला आहे.

## अक्कलकोटच्या गट शिक्षण अधिकारीपदी प्रसाद हरबाळे

### प्रभारी प्रा.शिक्षण अधिकारी मिरकले यांची माहिती

✔ सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट येथील गट शिक्षण अधिकारी पदासाठी प्रसाद हरबाळे यांची अधिकृतरित्या नियुक्ती केली असल्याचे प्रभारी प्राथमिक शिक्षणाधिकारी मिरकले यांनी दै.सुराज्य प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

अक्कलकोटच्या गटशिक्षणाधिकारी कुद्शिया शेख या सप्टेंबरअखेर ला सेवानिवृत्त झाल्या. त्यामुळे त्यांचा पदभार कोणाकडे द्यायचा याबाबत प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेण्यात आले होते . त्यानुसार अक्कलकोट तालुक्यात सद्यस्थितीत हरीश गायकवाड, प्रसाद आरबळे, दयानंद कवडे, वाले हे चार विस्तार अधिकारी कार्यरत आहेत. या चारही जणांची नावे पदभार देण्यासाठी कळवण्यात आली होती. यातील एका विस्तार अधिकाऱ्याचे नाव गटशिक्षण अधिकाऱ्याचा पदभार देण्यासाठी कळवावे असे पत्र जिल्हा परिषद प्रशासनाने प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना दिले. त्यावरून शिक्षण विभागातून गायकवाड, आरबळे की आणखी कोणाचे नाव जाणार याकडे सर्वांचे लक्ष वेधले होते. मुख्यालयातच कार्यरत असलेल्या विस्तार अधिकारी रतिलाल भुसे यांची नियुक्ती झाल्याची विनाकारण झेडपीच्या आवारात चर्चेला उधाण आले होते . पण याबाबत प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रसाद मिरकले यांना विचारल्यावर त्यांनी याबाबतचा खुलासा करताना सांगितले की गटशिक्षणाधिकाऱ्याचा पदभार प्रसाद आरबाळे यांची नियुक्ती केली असल्याचे काल रात्री उशिरा सांगण्यात आले गटशिक्षणाधिकारीपदाचा तात्पुरता पदभार कोणाला मिळणार हा अक्कलकोट तालुक्यात सध्या चर्चेचा विषय झाला होता तालुक्यात चार विस्तार अधिकारी असताना मुख्यालयातील अधिकारी आयात का करता ? असाही सवाल शिक्षकांमधून उपस्थित केला जात होता. तर काही जणांनी हा पदभार मिळावा म्हणून राजकिय वजन आणि जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांकडे फिल्डिंग लावण्याचा वरिष्ठ पातळी करून प्रयत्न केला असल्याचे बोलले जात होते. अखेर काल उशिरा या विषयावर पडदा पडला.

## फटाके विक्रीचे तात्पुरते परवाने घ्या : जिल्हाधिकारी

### २५ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्याचे प्रशासनाचे आवाहन

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हयात दिपावली सणाकरीता शोभेच्या दारु विक्रीचे (फटाके विक्रीचे) तात्पुरते परवाने वितरीत करण्यात येणार आहेत. तात्पुरत्या परवान्यासाठी विहित नमून्यातील (इए- ५) अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयातील गृह शाखेत उपलब्ध आहेत. परवानासाठी २५ ऑक्टोबर पर्यंत अर्ज करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

परवाना घेण्यासाठी अर्जातील माहिती पूर्णपणे भरुन देऊन त्या सोबत अर्जदाराचे दोन फोटो, ग्रामपंचायत ,नगरपालिका, नगरपरिषद यांचेकडील विहीत मुद्दयांबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र, १८ वर्ष पूर्ण झालेबाबतचा वयाचा पुरावा (एल. सी./जन्मदाखला), संबंधित जागेचे ७/१२ किंवा मिळकत उतारा व नकाशा जागेबाबत स्थानिक प्राधिकरणाचे संमतीपत्र , स्वंयघोषणापत्र जोडावे चौकशीअंती .६०० रूपये चलन भरून परवाना देण्यात येईल.

यापूर्वी काढण्यात आलेल्या परवान्याची प्रत असेतर जोडावी १० ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर या कालावधीत अर्ज सादर करावेत. परवाने देणेपूर्वी पोलीस विभागाकडून चौकशी अहवाल प्राप्त होणे आवश्यक असल्याने दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही असे आवाहन जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद सोलापूर यांनी केले आहे.

## माळशिरस येथे कोयत्याने हल्ला; तरुण जखमी





✔ **सोलापूर** : सकाळी झालेल्या किरकोळ भांडणावरून कोयता आणि काठीने केलेल्या मारहाणीत गौतम मिल्का काळे (वय २७, रा.माळशिरस) हा जखमी झाला. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास जखमीच्या घराजवळ घडली. त्याला माळशिरस येथे प्राथमिक उपचार करून संगीता काळे (पत्नी) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्याला प्रशांत साळुंखे, दीपक कांबळे, अशरफ आणि अन्य दोघे असे एकूण ५ जणांनी मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



लोकांचे टेन्शन काही दिवस आपल्याला कमी करायचे आहे!

कल्याण
368-75-456

मुंबई
369-80-668

# सिलिंडरच्या नऊ स्फोटांनी पिंपरी-चिंचवड हादरले

## गॅस चोरीचा काळाबाजार समोर, नागरिकांचा जीव धोक्यात

✔ सुराज्य/पिंपरी चिंचवड

पिंपरी-चिंचवड शहरातील ताथवडे येथे रविवारी रात्री अचानक एकामागोमाग एक नऊ स्फोट झाले. मात्र, स्फोट कशाचे झाले हे काही समोर आले नव्हते. पोलिसांनी केलेल्या अंतिम तपासात टँकर मधून अनधिकृत रित्या गॅस चोरी करताना गॅसच्या नऊ टाक्याचे स्फोट झाल्याचे समोर आले.

या स्फोटाने शेजारी असलेल्या इमारती अक्षरशः हादरून गेल्या होत्या. मात्र, अग्निशामक दलाच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली. या स्फोटात तीन स्कूल बस जळून खाक झाल्या. त्यामुळे पुन्हा एकदा पिंपरी-चिंचवड शहरात गॅस चोरीचा गोरख धंदा सुरू असल्याचं धक्कादायक वास्तव समोर आले. हा सर्व प्रकार जेएसपीएम या संस्थेलगत घडला. मात्र, या घडलेल्या स्फोटाला आणि गॅस चोरीला पोलिस प्रशासनच जबाबदार असल्याचा आरोप आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी पोलिसांवर केला आहे.फ

तानाजी सावंत यांनी आज सकाळी या घटनास्थळाला भेट दिली. संपूर्ण पाहणी केल्यानंतर त्यांनी या गॅस चोरीला पोलिसच जबाबदार असल्याचे तानाजी सावंत म्हणाले आहेत. तानाजी सावंत यांच्या जेएसपीएम संस्थेच्या ब्लॉसम शाळेलगत हा धक्कादायक प्रकार घडला. सावंत यांनी थेट ससूनमधील ड्रग्स माफियाशीच या घटनेची तुलना केल्याचे पहायला मिळाले.

जेएसपीएम ही संस्था आरोग्यमंत्री यांची स्वत:ची आहे. त्यामुळे त्यांनी तातडीने घटनास्थळला भेट दिली. यावेळी त्यांनी पिंपरी-चिंचवड पोलिसांची चांगलीच खरडपट्टी देखील काढली. ही गॅस चोरीची घटना दिवस घडली असती तर केवढं नुकसान आणि हानी झाली असती याचा विचार न केलेला बरा, असेही सावंत म्हणाले. या भागात चालणारा हा काळा बाजार पोलिसांच्या आशीर्वादानेच सुरू असल्याचे सावंत म्हणाले

ज्यावेळी पहिला स्फोट झाला त्यावेळी परिसरात असलेल्या सोसायटी हादरल्या होत्या. बसला आग लागल्याने त्याची भीषणता जाणवली होती. त्यामुळे परिसरातील सर्व नागरिक रस्त्यावर आले होते. या परिसरात शाळा, कॉलेज असल्यामुळे विद्यार्थ्यांचे हॉस्टेलही आहे. त्यामुळे विद्यार्थीही या स्फोटचा आवाज ऐकून बाहेर आले. त्यामुळे रस्त्यावर मोठी गर्दी देखील झाल्याचे पाहायला मिळाले.



या संदर्भात पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तिघांना ताब्यात देखील घेतले आहे. यात जागा मालक, चोरीच्या गॅसची विक्री करणारा अन सिलिंडरची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या टेम्पो चालकाचा समावेश आहे. मात्र, टँकर चालक अद्याप ही फरार आहे. एकामागोमाग एक नऊ स्फोट झाल्यानंतर गॅस चोरीचा हा काळाबाजार पुन्हा एकदा समोर आला आहे.